MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue Oct-2018

Vidyawarta®

International Multilingual Refereed Research Journal

# 2nd International Conference on Dialoguing Borders : Vital Issues in Humanities, Commerce, IT and Management'

6th - 7th October 2018



❖ Chief Editors ❖

Dr.D.N.Ganjewar

Dr.S.K.Sarje

56) Roots and Routes: Representation of Partition in Indian Hindi Cinema
**Mr. Atkare Kailash Ankushrao & Dr. Farhana Khan** ||207

57) SUBJUGATION OF WOMAN IN VIJAY TENDULKAR'S SILENCE! THE COURT IS IN SESSION
**Mr. Ingle Ajabrao** ||212

58) ROLE OF WOMEN EMPOWERMENT IN NATION BUILDING IN PERSPECTIVE WORK OF ...
**Makrand Ramrao Wakde** ||214

59) A Study of Women's Identity in Namita Gokhale's Fiction
**Shelke Geetanjali Anantrao & Dr. Sarje S. K.** ||217

60) "WOMEN, EDUCATION AND THE INDIAN SCENARIO: A STUDY OF MANJU KAPUR'S NOVELS"
**SIDDHAARTH G GHAGARE** ||219

61) An Objective feminist reading of the novel atlas shrugged by ayn Rand
**Mr. D. R. Chavan** ||225

62) Racism in the July's People by Nadine Gordimer
**Dr. Anita Mudkanna & Mr. Gopal Maruti Jadhav** ||229

63) Gender Conflict and its consciquences in Anita Nair's 'Mistress'
**Kadam K. R. & Moghekar N. M.** ||232

64) Gender and Feminine consciousness in The Dark Holds No Terrors by...
**Dr. Devanand Sadanand Puri** ||234

65) भारतातील शिक्षणविषयक हक्काची अंमलबजावणी व परिणाम
**प्रा. धर्मराज केशवराव कटके,** ||236

66) अण्णा भाऊ साठे : व्यक्ती आणि वाङ्मय
**डॉ. आरती शिंदे** ||241

67) "कथा लेखिकांच्या कथातून आलेल्या स्त्री जाणिवा"
**प्रा.डॉ. जगतवाड शिवाजी पिराजी,** ||245

68) पंचायतराज व्यवस्थेमधील महिला नेतृत्वाचे सक्षमीकरण एक राजकिय दृष्टीक्षेप.
डॉ. कदम एच. पी., ||248

69) महिला सक्षमीकरण एक : दृष्टीक्षेप
प्रा. डॉ. कदम डी. एम., ||250

www.vidyawarta.com/03 — http://www.printingarea.blogspot.com

65

# भारतातील शिक्षणविषयक हक्काची अंमलबजावणी व परिणाम

प्रा. धर्मराज केशवराव कटके
लोकप्रशासन विभागप्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय गढी,
ता. गेवराई जि. बीड

**********

## प्रस्तावना :

शिक्षणविषयक अधिकार हा मुलभूत अधिकार आहे. युनेस्कोने २०१५ पासून श्सर्वांसाठी शिक्षण हे धोरण जाहीर केले आहे. युनेस्कोच्या "Education for all Global Monitoring Report 2010" मध्ये जगातील १३५ देशांनी आपल्या देशातील नागरिकांसाठी मोफत शिक्षणासंबंधी घटनात्मक तरतुदी केलेला उल्लेख आहे.

भारतीय राज्यघटनेत मुलभूत अधिकार कलम १२ ते ३५ अंतर्गत प्राप्त झालेले आहेत. भारतीय राज्यघटनेतील कलम २१ नुसार जीवितांचा अधिकार प्राप्त झाला आहे. त्या अनुषंगाने भारत सरकार नागरिकांना अधिकाधिक चांगले जीवन प्रदान करण्यासाठी विविध नवीन तरतुदी करतांना दिसून येते. ८६ व्या घटनादुरुस्ती कायद्यान्वये २००२ मध्ये श्मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणश या तरतुदींचा समावेश असणारे २१ अ हे नवीन कलम जीवितांचा अधिकार या मुलभूत अधिकारात समाविष्ट करण्यात आले. भारतात शिक्षण विषयक मुलभूत अधिकार स्वातंत्र्याच्या ६२ वर्षानंतर प्राप्त झाला. शिक्षणविषयक मुलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी भारतीय संसदेने बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ हा ऑगस्ट २००९ मध्ये संमत केला. राष्ट्रपतींच्या मान्यतेनंतर हा अधिनियम १ एप्रिल २०१० पासून संपूर्ण देशभरात जम्मू व काश्मिर वगळता लागू होत असल्याची अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली.

**Keywords:** शिक्षण विषयक हक्काची ऐतिहासिक पार्श्वभूमी, शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतूदी आणि अंमलबजावणी.

## अभ्यासाची उदिदष्टे :

१) शिक्षणविषयक हक्काची ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदींचा अभ्यास करणे.

३) शिक्षणविषयक हक्कांच्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे.

## संशोधन पध्दती :

संशोधन विषयाच्या संदर्भातील माहिती, तथ्य संकलीत करण्यासाठी द्वितीय स्त्रोतांचा अवलंब करण्यात आला आहे. त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, शिक्षण विषयक हक्क अधिनियम, विविध शैक्षणिक आयोगांचे अहवाल, शासकीय अहवाल, संशोधनपत्रिका इत्यादींचा प्रामुख्याने यामध्ये समावेश आहे.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी :

शिक्षणविषयक मुलभूत अधिकार बालकांना स्वातंत्र्याच्या ५५ वर्षानंतर प्राप्त झाला असला तरीही भारतात यासाठीचे प्रयत्न स्वातंत्र्यपूर्व काळात झाल्याचे दिसून येतात. स्वातंत्र्यपूर्व काळात इ.स. १८७० मध्ये ब्रिटीश राजवटीत सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम संमत करण्यात आला होता. परंतु त्यामध्ये मोफत शिक्षण असा उल्लेख नव्हता. थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांनी १८८२ मध्ये हंटर आयोगापुढे भारतीय नागरिकांना मोफत शिक्षणाची व्यवस्था करण्याची मागणी केली होती. भारतात सर्वप्रथम बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी ब्रिटीशांकडून मोफत शिक्षणाची वाट न पाहता इ.स. १८८३ मध्ये अमरेली येथे तालुक्यातील मुलींसाठी मोफत शिक्षणाची व्यवस्था केली. येथेच मोफत शिक्षण व्यवस्थेची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. त्यानंतर १९०९ मध्ये या योजनेचा आणखी विस्तार घडवून आणला.

गोपालकृष्ण गोखले यांनी १९०६ मध्ये

65

# भारतातील शिक्षणविषयक हक्काची अंमलबजावणी व परिणाम

**प्रा. धर्मराज केशवराव कटके**
लोकप्रशासन विभागप्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय गढी,
ता. गेवराई जि. बीड

**********

**प्रस्तावना :**

शिक्षणविषयक अधिकार हा मुलभूत अधिकार आहे. युनेस्कोने २०१५ पासून श्सर्वांसाठी शिक्षण हे धोरण जाहीर केले आहे. युनेस्कोच्या "Education for all Global Monitoring Report 2010" मध्ये जगातील १३५ देशांनी आपल्या देशातील नागरिकांसाठी मोफत शिक्षणासंबंधी घटनात्मक तरतुदी केलेला उल्लेख आहे.

भारतीय राज्यघटनेत मुलभूत अधिकार कलम १२ ते ३५ अंतर्गत प्राप्त झालेले आहेत. भारतीय राज्यघटनेतील कलम २१ नुसार जीवितांचा अधिकार प्राप्त झाला आहे. त्या अनुषंगाने भारत सरकार नागरिकांना अधिकाधिक चांगले जीवन प्रदान करण्यासाठी विविध नवीन तरतुदी करतांना दिसून येते. ८६ व्या घटनादुरुस्ती कायद्यान्वये २००२ मध्ये श्मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षणश्‍ या तरतुदींचा समावेश असणारे २१ अ हे नवीन कलम जीवितांचा अधिकार या मुलभूत अधिकारात समाविष्ट करण्यात आले. भारतात शिक्षण विषयक मुलभूत अधिकार स्वातंत्र्याच्या ६२ वर्षानंतर प्राप्त झाला. शिक्षणविषयक मुलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी भारतीय संसदेने बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ हा ऑगस्ट २००९ मध्ये संमत केला. राष्ट्रपतींच्या मान्यतेनंतर हा अधिनियम १ एप्रिल २०१० पासून संपूर्ण देशभरात जम्मू व काश्मिर वगळता लागू होत असल्याची अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली.

**Keywords:** शिक्षण विषयक हक्काची ऐतिहासिक पार्श्वभूमी, शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतूदी आणि अंमलबजावणी.

**अभ्यासाची उदिदष्टे :**

१) शिक्षणविषयक हक्काची ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदींचा अभ्यास करणे.

३) शिक्षणविषयक हक्कांच्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

संशोधन विषयाच्या संदर्भातील माहिती, तथ्य संकलीत करण्यासाठी द्वितीय स्त्रोतांचा अवलंब करण्यात आला आहे. त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, शिक्षण विषयक हक्क अधिनियम, विविध शैक्षणिक आयोगांचे अहवाल, शासकीय अहवाल, संशोधनपत्रिका इत्यादींचा प्रामुख्याने यामध्ये समावेश आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

शिक्षणविषयक मुलभूत अधिकार बालकांना स्वातंत्र्याच्या ५५ वर्षानंतर प्राप्त झाला असला तरीही भारतात यासाठीचे प्रयत्न स्वातंत्र्यपूर्व काळात झाल्याचे दिसून येतात. स्वातंत्र्यपूर्व काळात इ.स. १८७० मध्ये ब्रिटीश राजवटीत सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम संमत करण्यात आला होता. परंतु त्यामध्ये मोफत शिक्षण असा उल्लेख नव्हता. थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांनी १८८२ मध्ये हंटर आयोगापुढे भारतीय नागरिकांना मोफत शिक्षणाची व्यवस्था करण्याची मागणी केली होती. भारतात सर्वप्रथम बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी ब्रिटीशांकडून मोफत शिक्षणाची वाट न पाहता इ.स. १८८३ मध्ये अमरेली येथे तालुक्यातील मुलींसाठी मोफत शिक्षणाची व्यवस्था केली. येथेच मोफत शिक्षण व्यवस्थेची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. त्यानंतर १९०९ मध्ये या योजनेचा आणखी विस्तार घडवून आणला.

गोपालकृष्ण गोखले यांनी १९०६ मध्ये

इंपिरिअल विधानपरिषदेपुढे मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा प्रस्ताव मांडण्यात पुढाकार घेतला. १९१७ मध्ये विठ्ठलभाई पटेलांनी ना. गोखले यांचा प्रस्ताव मंजूर करुन घेतला आणि तो पटेल ॲक्ट नावाने पास झाला. त्याकाळात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात मोफत व सक्तीच्या शिक्षणाची अंमलबजावणी केली. ब्रिटीश शासनाने १९१८ मध्ये घटनात्मक सूचीमध्ये या कायद्याचा अंतर्भाव केला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने १९४७ मध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी मा. खेर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. या समितीने देशातील संपूर्ण बालकांना प्राथमिक शिक्षणाची सुविधा निर्माण करुन देणाऱ्या मार्गाचा व साधनांचा अभ्यास केला. याचवर्षी बालकांच्या मुलभूत हक्कांमध्ये नोंद घेण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९४९ मध्ये १४ वर्षे वयापर्यंतच्या बालकांना मजूरी करण्यास अमान्य करुन शिक्षणासंबंधीचा विचार मांडला. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वांतील ४५ व्या कलमां मध्ये मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा स्वीकार करण्यास सांगितलेले आहे. स्वातंत्र्यानंतर देशात नागरिकांना शिक्षण देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारंकडून विविध कायदे, धोरणांची निर्मिती करण्यात आली. तसेच त्याची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्यात आली. तसेच शिक्षणविषयक विविध आयोगांची स्थापना करुन त्यांच्या शिक्षणविषयक शिफारशी स्वीकारण्यात आल्या. भारतात त्या—त्या काळात नवीन शैक्षणिक धोरणे अंमलात आणण्यात आली. परंतु तरीही देशातील सर्व बालकांना प्राथमिक शिक्षण देखील मिळू शकले. नाही. त्यातूनच संपूर्ण देशभरातून प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे मागणी जोर धरु लागली आणि १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा नंतर प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे जोरकसपणे प्रयत्न सुरु झाले. १४ मे २००१ मध्ये प्राथमिक शिक्षणाचा अधिकार हे विधेयक राज्यसभेत संमत करण्यात आले. २८ नोव्हेंबर २००१ मध्ये हे विधेयक लोकसभेत सर्वानुमते संमत करण्यात आले. ८६ व्या घटनादुरुस्ती कायद्यान्वये सन २००२ मध्ये राज्यघटनेच्या मुलभूत अधिकारात 'जीविताचा अधिकार' अंतर्गत २१ अ हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले. कलम २१ अ मध्ये "The State shall provide free and compulsory education to all children of the age of six to fourteen in such manner as the state may, be law determine" असे नमुद केले गेले.

२००३—बालकांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षणाचे विधेयक.

२००४—बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाचे विधेयक.

२००५—शिक्षणाच्या हक्काचे विधेयक जुन २००५ (CABE विधेयक).

२००५—शिक्षणाच्या हक्काचे विधेयक ऑगस्ट २००५ (CABE विधेयक).

तसेच प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी सर्व शिक्षा अभियान सुरु करण्यात आले. सर्व शिक्षा अभियानामध्ये सन २००३, २००७, २०१० पर्यंत प्राप्त करावयाचे उद्दिष्ट ठरवण्यात आले. परंतु या अभियानाअंतर्गत विविध योजना, उपक्रम राबवून देखील अपेक्षित यश प्राप्त झाले नाही. म्हणून २००५ मध्ये शिक्षणाचा मुलभूत अधिकार कायद्याचा मसुदा तयार करण्यात आला. २००८ मध्ये केंद्रीय मंत्रीमंडळ आणि लोकसभा यांनी मान्यता देऊन हे विधेयक राज्यसभेकडे पाठवण्यात आले. २० जुलै २००९ रोजी राज्यसभेने या विधेयकास मान्यता दिली. ४ ऑगस्ट २००९ रोजी चर्चा व दुरुस्त्या करुन हे विधेयक राष्ट्रपतींकडे मान्यतेसाठी मान्यतेसाठी पाठविण्यात आले. २० ऑगस्ट २००९ रोजी मा. राष्ट्रपतींनी या विधेयकावर शिक्कामोर्तब केले आणि २७ ऑगस्ट २००९ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले.

**बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदी :**

**कलम १ —संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ :**

या कलमामध्ये बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ असे म्हटले असून जम्मू—काश्मिर वगळता संपूर्ण भारतभर हा कायदा लागू झाल्याचे स्पष्ट केलेले आहे.

**कलम १४ — प्रवेश घेताना वयाचा पुरावा :**

शाळेत प्रवेश घेतांना जन्म दाखला किंवा विहित केलेल्या पुरावे ग्राह्य धरण्यात येतील. परंतु वयाच्या पुराव्याअभावी कोणत्याही बालकास शाळेत प्रवेश घेण्यास मज्जाव करता येणार नाही.

**कलम १५ — शाळेत प्रवेश नाकारला न जाण्याची तरतूद :**

शैक्षणिक वर्षाच्या कोणत्याही कालावधीत प्रवेश मागितला तर तो नाकारण्यात येणार नाही.

**कलम १६ — बालकाला त्याच वर्गात ठेवण्यास व शाळेतून काढून टाकण्यास प्रतिबंध :**

या कलमान्वये बालकास शैक्षणिक वर्षाच्या समाप्तीनंतर त्याच वर्गात ठेवण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. तसेच कोणत्याही बालकास शाळेतून काढून टाकण्यास प्रतिबंध केला आहे.

**कलम १७ — बालकास शासन करण्यास प्रतिबंध :**

या कलमान्वये कोणत्याही बालकास शारीरिक किंवा मानसिक त्रास देण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे. या तरतुदीचे उल्लंघन केल्यास त्या व्यक्ति विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद केलेली आहे.

**कलम १८ — मान्यता प्रमाणपत्राशिवाय शाळा स्थापन करण्यास मनाई :**

या कलमानुसार खाजगी शाळा सुरु करण्यासाठी मान्यता प्रमाणपत्र अनिवार्य केलेले आहे. मान्यता प्रमाणपत्राशिवाय शाळा सुरु करण्यास मनाई केलेली आहे. मान्यता प्रमाणपत्राशिवाय शाळा सुरु केल्यास त्या संबंधित व्यक्तीस एक लाख रुपयापर्यंतचा दंड व शाळा सुरु असेपर्यंत प्रतिदिन दहा हजार रुपये दंड वसूल करण्याची तरतूद केलेली आहे.

**कलम १९** — शाळेसाठी असलेली मानके व निकष

**कलम २०** — केंद्रशासनाला अनुसूचिमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार

**कलम २१** — शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना करण्याचे निर्देश व रचना व कार्ये यांचा तपशील नमूद करण्यात आला आहे.

**कलम २२** — शालेय विकास योजनाची निर्मिती.

**कलम २३** — शिक्षकांची नेमणूक करण्यासाठी पात्रता व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.

**कलम २४** — शिक्षकांची कर्तव्ये आणि गाऱ्हाणी दूर करणे.

**कलम २५** — विद्यार्थी –शिक्षक प्रमाण.

**कलम २६** — शिक्षकांची रिक्त पदे भरणे.

या कलमान्वये शासन नियंत्रित असलेल्या शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे एकूण पदांच्या दहा टक्क्यांहून अधिक असणार नाहीत, याची खात्री करुन घेणे. हे रिक्त पदे तात्काळ भरणे.

**कलम २७ — शिक्षकांना अशैक्षणिक कामे लादण्यास मनाई :**

कोणत्याही शिक्षकांना जनगणना, आपत्ती निवारणाची कामे, स्थानिक प्राधिकरण किंवा राज्य विधानसभा किंवा लोकसभा निवडणुकांच्या कर्तव्याखेरीज इतर कोणत्याही प्रकारचे अशैक्षणीक कामे लादण्यात येणार नाही.

**कलम २८** — शिक्षकांना खाजगी शिकवणी घेण्यास मनाई करण्यात आली आहे.

**प्रकरण ५** — प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण करणे.

**कलम २९** — प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रम व मुल्यमापण प्रक्रिया.

**कलम ३०** — परीक्षा पूर्तता प्रमाणपत्र.

या कलमान्वये कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षणपूर्ण होईपर्यंत मंडळाची कोणतीही परिक्षा पास होणे आवश्यक असणार नाही व प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर बालकास विहित नमुन्यात पूर्तता प्रमाणपत्र देण्यात येईल.

**प्रकरण ६ — वे :** बालकाच्या हक्कांचे संरक्षण.

**कलम ३१** — बालकाच्या शिक्षण हक्कांचे संनियंत्रण.

**कलम ३२** — अधिकारासंबंधीची गाऱ्हाणी दूर करणे.

**कलम ३३** — राष्ट्रीय सल्लागार परिषदेची स्थापना.

अधिनियमातील तरतूदींची परिणामकारक अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाला सल्ला देण्यासाठी केंद्र सरकारने प्राथमिक शिक्षण व बालविकास या क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींचा अंतर्भाव असलेली आधिकाधिक १५ सदस्यांचा समावेश असणारी राष्ट्रीय

सल्लागार परिषद स्थापन करावयाची आहे.

**कलम ३४ — राज्य सल्लागार परिषदेची स्थापना :**

संबंधित राज्यसरकारने शासनाला अधिनियमातील तरतूदींची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक सल्ला देण्यासाठी सल्लागार परिषदेची स्थापना करावयाची आहे.

**प्रकरण ७**

**कलम ३५** — निर्देश देण्याचा अधिकार

**कलम ३६** — खटला चालविण्यासाठी पूर्व मंजुरी घेणे.

**कलम ३७** — सद्भावनापूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

**कलम ३८ — समुचित शासनाचा नियम करण्याचा अधिकार :**

या कलमानवये समुचित शासनास व अधिनियमांच्या सर्वसाधारणतेस बाधा न आणता अंमलबजावणीसाठी आवश्यक असे नियम करण्याचा अधिकार आहे.

**शिक्षणविषयक हक्कांची अंमलबजावणी व परिणाम :**

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क कायद्यामुळे शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण घडून येत आहे. शिक्षणविषयक हक्क कायद्यांमुळे विद्यार्थी : शिक्षक प्रमाण ४०:१ वरुन ३०:१ वर येण्यास मदत झाली. वाडया, वस्तीवरील एक शिक्षकी शाळांचे द्विशिक्षकी शाळेत रुपांतर झालेले आहे. वंचित, दुर्लक्षित दुर्गम भागात देखील शाळेला आवश्यक असणारी भौतिक संसाधने, जसे की, वर्ग खोल्या, शौचालये, पुस्तके यांच्या प्रमाणात वाढ झाली. परिणामस्वरुप या बाबी शिक्षणविषयक गुणवत्ता वर्धन करण्यास पूरक ठरत आहेत. खासगी शिक्षणसंस्था मध्ये देखील वंचित व दुर्बल घटकांतील बालकांसाठी २५ टक्के प्रवेश आरक्षित ठेवण्यात आले आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या काळात शिक्षणविषयक हक्कांची अंमलबजावणी करण्यास विलंब झालेला दिसून येतो. तरीही आज शिक्षण विषयक हक्क कायद्यामुळे अधिकाधिक बालकांना शिक्षणाचा मुलभूत अधिकार प्राप्त होत आहे. देशातील ६ ते १४ वर्ष वयोगटातील बालकांना शिक्षणाचा मुलभूत अधिकार प्राप्त होत असला तरीही अलिकडेच एक्रायश च्या प्राप्त अहवालानुसार देशात १२ दशलक्ष बालकामगार शिक्षणाच्या हक्कापासून वंचित असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रासारख्या राज्यात देखील १३ टक्क्यांपेक्षा अधिक शाळांच्या इमारती ह्या धोकादायक व कमजोर अवस्थेत आहेत. आजही २१ टक्के शाळांना संरक्षण भिंत नाही. ६९ टक्के शाळां मध्ये शौचालयाचा वापर होत नसल्याचे दिसून येते. तसेच आजच्या काळात देखील ६३ टक्के शाळांत पिण्यायोग्य शुध्द पाणी देखील मिळत नसल्याचे आढळून आले आहे. परिणामस्वरुप मुलांच्या आरोग्यावर परिणाम होवून त्याची परिणिती विाध्यांच्या स्थगन, गळतीवर होते आणि बालके शिक्षणविषयक हक्कांपासून दूर राहतात. महाराष्ट्रासारख्या राज्यात ३४ टक्के शाळांना खेळाचे मैदान उपलब्ध नाही. त्यामुळे खेळाच्या संधी बालकांना प्राप्त होवू शकत नाहीत. खेळाच्या माध्यमातून बालक निरोगी घडते. परिणामी शिक्षणाकडे आकर्षित होते. बालकांना शाळेत आकर्षित करण्यासाठी शिक्षक एवढेच महत्त्वपूर्ण भौतिक संसाधने ही आहेत. मानवी व भौतिक संसाधनाच्या परिपूर्णतेने गुणवत्ता पूर्ण शिक्षण आणि अर्थपूर्ण अध्ययन, अध्यापनाच्या प्रक्रियेच्या सुयोग्य वातावरणाची निर्मिती घडून येते. मध्यान्ह भोजन योजना, शिष्यवृत्ती योजना, युनिफॉर्म सारख्या सुविधांमध्ये वाढ करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

आज जागतिकीकरण, खाजगीकरणाच्या प्रक्रियेत बालकांच्या शिक्षणविषयक हक्कांची पायमल्ली होतांना दिसून येत आहे. शिक्षण देणे हा सेवाभाव आजच्या शिक्षण पध्दतीत कमी होतांना दिसून येत आहे तर एनफा कमाविण्यासाठी शिक्षण संस्थाए अशा प्रकारचे कंपनी किंवा खाजगी स्वरुप शिक्षणव्यवस्थेत वाढत असल्यामुळे बालकांच्या शिक्षणविषयक हक्कांच्या बाबतीत हा प्रचंड मोठा धोका येणाऱ्या काळात दिसून येत आहे. त्यासाठी केंद्रशासन, राज्यशासन, स्थानिक शासन यांच्या स्तरावर प्रत्येक घटकांची जबाबदारी निश्चित करुन उत्तरदायित्व स्वीकारणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रबळ राजकीय इच्छाशक्ती आणि प्रबळ

राजकीय इच्छाशक्तीच्या जोरावर आर्थिक पाठबळ या कायद्याच्या अंमलबजावणीस देणे गरजेचे आहे. शिक्षण विषयक प्रक्रियेत सहभागी असणाऱ्या प्रशासकीय अधिकारी, व्यवस्थापक, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक यांनी स्वहितापेक्षा विद्यार्थीहित लक्षात घेवून शालेय अभ्यासक्रम, परीक्षा पध्दती यामध्ये कालसुसंगत बदलासाठी नवीन बदलांना विरोध न करता सकारात्मकता स्वीकारणे गरजेचे आहे. शासन, शिक्षणसंस्था, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक या सर्वांच्या सकारात्मकतेतच शिक्षण विषयक हक्कांच्या अंमलबजावणीचे यश अवलंबून आहे.


संदर्भ ग्रंथ :

१) Aggarwal J.C. (1994), 'Recent Development and Trends in Education; concept publishing company, New Delhi, India.

२) डॉ. सौ. प्रतिभा सुधीर पेंडके भारतातील शिक्षणपध्दतीचा विकास आणि शालेय प्रक्रियेचे अधिष्ठाण मंगेश प्रकाशन, नागपूर, भारत.

३) भारत २०१६, सूचना व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.

४) Government of India, Education in Eleventh Fire year plan-2017-12.

५) Government of India RTE 2009.

६) Report of India Education Commission (1882).

७) Yojna 78.


❑❑❑

66

# अण्णा भाऊ साठे : व्यक्ती आणि वाङ्मय

डॉ. आरती शिंदे


**सारांश (Abstract)**

महाराष्ट्रातील थोर साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांचा जन्म भाऊराव व वालुबाई यांच्या पोटी १ ऑगस्ट १९२० साली वाटेगावच्या मांगवाड्यात झाला. त्यांचे मुळ नाव तुकाराम असे होते. वाटेगाव हे खेडे सध्याच्या सांगली जिल्ह्याच्या वाळवा तालुक्यात, पुणे-बंगलोर महामार्गावरील कासेगावच्या तीन मैल पूर्वेला आहे. त्या काळच्या जातिप्रथेनुसार अणा भाऊ हे मांग जातीचे होते. मांग समाज हा महाराष्ट्रातील सर्वांत मागास आणि दलित असा समाज म्हणून ओळखला जात असे. अण्णा भाऊंची जात ही शूद्र जातींपैकी एक होती. त्या जातीतील लोकांना उत्पन्नाचे कुठलेही खात्रीशीर साधन नव्हते.

अण्णा भाऊ साठे हे एक प्रतिभावान लेखक महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेर देखील प्रसिद्ध आहेत. अण्णा भाऊंनी विविध वाङ्मयप्रकारांतून मौलिक स्वरूपाचे लेखन केले आहे. कथा, कादंबऱ्या, काव्य, तमाशे, लावण्या, पोवाडे, छक्कड असे विविध साहित्यप्रकार अण्णा भाऊंनी लिहून आपल्यातील साहित्यिकाचा जगाला परिचय करून दिला. हा परिचय महाराष्ट्रच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरील साहित्यप्रेमी कधीही विसरू शकणार नाहीत. त्यांचे योगदान हे चीरकाल टिकणारे आहे. महाराष्ट्रात शालेय शिक्षणात त्यांचे साहित्य अभ्यासले तर जातेच मराठी भाषेतील पदवी व पदव्युत्तर स्तरावर देखील अण्णा भाऊंचे साहित्य अभ्यासक्रमात अंतर्भूत आहे. अण्णा भाऊंच्या साहित्यावर अनेक संशोधकांनी संशोधन प्रबंध लिहिले असून संशोधनपर निबंध, गौरवपर निबंध नेहमीच लिहिली, वाचली व अभ्यासली जातात. दलित साहित्यातील तसेच ग्रामीण साहित्यातील त्यांचे योगदान हे चिरंतन अभ्यासण्याजोगे आहे. ग्रामीण साहित्याच्या अभ्यासकांना अण्णांचे साहित्य नेहमीच भुरळ पाडते. प्रस्तुत अभ्यास निबंधात अण्णा भाऊ साठे यांचे व्यक्तित्व आणि त्यांचे वाङ्मय यांचा संक्षिप्त परिचय देण्यात आला आहे.


बालपणातील अण्णा भाऊंच्या घडणीमध्ये मोठ्या प्रमाणात